कारण सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाहीत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २४ एप्रिल २०२५ | अंक १३३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# पाकिस्तानचं कंबरडंच मोडलं: एकही गोळी न चालवता भारताने घेतला पहलगामचा बदला



मंगळवारी दुपारी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भयानक दहशतवादी हल्ल्यात 28 निष्पाप नागरिकांची निर्घृण हत्या करण्यात आली. या भ्याड हल्ल्याची जबाबदारी काही दहशतवादी संघटनांनी स्वीकारली असली तरी, भारताने त्यासाठी थेट पाकिस्तानला जबाबदार धरले आहे. या हल्ल्याच्या 24 तासांच्या आत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची ( कैबिनेट कमेटी ऑन सिक्युरिटी – CCS) बैठक झाली. यामध्ये भारताने पाकिस्तानविरुद्ध एकामागून एक 5 मोठे निर्णय घेतले. भारत आता फक्त निषेध करणार नाही तर कारवाईदेखील करेल असा स्पष्ट संदेश जगाला मिळाला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील का झालेल्या या आपत्कालीन बैठकीत भारताने असा सर्जिकल डिप्लोमॅटिक स्ट्राईक केलाय की त्याने पाकिस्तानचं कंबरडंच मोडलं आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या हल्ल्यात एकही गोळी चालली नाही, तरीही पाकिस्तानचा नाश निश्चित आहे. पाकिस्तानच्या विनाशाची कहाणी लिहिणारे निर्णय कोणते आहेत ते सविस्तर जाणून घेऊया. सर्वात पहिला आणि मोठा निर्णय म्हणजे सिंधू पाणी करार रद्द करणे. हा तोच करार आहे ज्याअंतर्गत भारत गेल्या 60 वर्षांपासून पाकिस्तानला त्याच्या वाट्याचे पाणी देत होता. पण आता हे पाणी थांबवण्याची तयारी करण्यात आली आहे. सिंधू करार रोखल्याने पाकवर काय होणार परिणाम ?पाकिस्तानमधील 80०% शेती ही सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांच्या पाण्यावर अवलंबून आहे. या नद्यांवर बांधलेल्या अनेक धरणे आणि जलविद्युत प्रकल्पांमधूनही पाकिस्तान वीज निर्मिती करतो. अशा परिस्थितीत, भारताने पाणी रोखल्यामुळे पाकिस्तानमध्ये पाणी आणि वीज दोन्हीची तीव्र टंचाई निर्माण होऊ शकते. याचा मोठा परिणाम पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर आणि सामान्य जीवनावर होईल अटारी पोस्ट बंदअटारी बॉर्डर पोस्च बंद करण्याचा दुसरा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. भारत आणि पाकिस्तानमधील औपचारिक व्यापार आधीच थांबला असला तरी, काही वस्तूंचे व्यवहार लहान व्यापाऱ्यांच्या पातळीवर सुरूच होते. आता अटारी पोस्ट बंद झाल्यामुळे, हे छोटे व्यवहार देखील पूर्णपणे थांबतील, ज्यामुळे पाकिस्तानी व्यापाऱ्यांचे थेट नुकसान होईल. पाकिस्तानवर भारताची सर्वात मोठी कारवाईभारत आता पाकिस्तानशी सर्व प्रकारचे संबंध संपवण्याच्या दिशेने कारवाी करत असल्याने आता भारताने स्पष्ट केलं आ. व्हिसा नाही, व्यापार नाही आणि राजनैतिक संवाद नाही. भारताने पाकिस्तानला प्रत्येक आघाड्यावर एकाकी पाडण्याची रणनीती राबवण्यास सुरुवात केली आहे. पहलगाममधील शहीदांचा हा बदला राजनैतिक शस्त्रांनी घेण्यात आला आहे, ज्यामुळे पाकिस्तान पूर्णपणे हादरला आहे.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या तालुकाध्यक्षपदी हमीदखान पठाण यांची फेर निवड

पाटोदा (प्रतिनिधी) सामाजिक कार्यात नेहमीच पुढाकार घेणारे आणि तसेच डॉ.गणेश ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली भ्रष्टाचाराच्या विरोधात सातत्याने आवाज उठवणारे पाटोदा येथील पत्रकार हमिदखान पठाण यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या पाटोदा तालुकाध्यक्षपदी पुणे येथे एका बैठकीत फेर निवड करण्यात आली व निवडीची पत्र त्यांना समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. चंद्रकांत उदगुडे पाटील व महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष श्री. शांताराम खुडे पत्रकार हमिदखान पठाण यांना प्रदान करण्यात आले.पठाण यांची सामाजिक कार्याची दखल घेतली.गेल्या अनेक दिवसांपासून दिनदलित वंचित शेतकरी कष्टकरी यांच्या न्याय हक्कासाठी प्रशासनासमोर संघर्ष करत आहे तसेच पत्रकार यांच्यावर होणाऱ्या घटनेच्या विरोधात निर्भिड पुणे आवाज उठवतात त्यामुळे त्यामुळे तालुक्यातील पत्रकार बांधवांना पत्रकार बांधवांना एक



मोठा एक मोठा आधार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आधार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते तसेच तहसील पंचायत समिती भुमिअभिलेख भूमी अभिलेख पोलीस स्टेशन पोलीस स्टेशन पशुसंवर्धन पशुसंवर्धन या कार्यालयामध्ये या कार्यालयामध्ये सर्वसामान्यांची सर्वसामान्य ची कामे नडली असली तर कामे नडली असली तर त्या ठिकाणी त्या ठिकाणी हमीद खान पठाण त्या नागरिकांची कामे मार्गे लावतात त्यामुळे सर्वसामान्य जनतेला दप्तर दिरंगाई तसेच लाज देण्याची गरज पडत नाही त्यामुळे सर्वसामान्य जनतेमधून अमित कान पठाण यांना मान्यता मिळालेले असून तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब दिंडलित कष्टकरी माणूस हक्काचे व्यासपीठ म्हणून अमित कान पठाण यांच्याकडे दादमागतो व, आपल्या अडचणी मांडत असतो. त्यामुळे भ्रष्टाचार करणारांना मोठी जरब बसलेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# केज येथे बसडेपो साठी लाक्षणिक उपोषण




केज/प्रतिनिधी

केज येथे बसडेपो मंजूर करा व इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करा या मागणीसाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने मंगळवारी लाक्षणिक उपोषण करण्यात आले. केज येथे बसडेपो मंजुरीसाठी समिती गेली वीस वर्षे विविध आंदोलनाच्या रूपाने पाठपुरावा करत आहे. केज हे तालुक्याचे ठिकाण आता दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर आल्याने येथून दररोज हजारो प्रवासी येथून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बसगाड्यांनी प्रवास करत असतात. त्यामुळे येथे बसडेपो झाल्यास येथून आवश्यक त्या लांब पल्याच्या व स्थानिक परिसरात प्रवाशांच्या गरजेनुसार आवश्यक गाड्यांचे व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. यासाठी केज शहरात बीड रोड लगत राज्यपरिवहन मंडळाची सात एक्करहून अधिक जागा आरक्षित जागा सध्या पडून आहे. या जागेवर बसडेपो झाल्यास केजच्या विकासात भर पडणार आहे. आजच्या लाक्षणिक उपोषणास केज तहासिलचे तहसीलदार राकेश गिड्डे आणि किल्लेधारूर आगार प्रमुख श्री चौरे यांनी भेट देऊन याबाबत सकारात्मक अहवाल पाठवून सतत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या लाक्षणिक उपोषणात समितीचे समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, श्रीमती इंदूबाई घोरपडे, भाग्यश्री पैठणकर, नासेर मुंडे, महेश जाजू, प्रवीण देशपांडे, विकास मिरगणे, इंजिनिअर मोहनराव कराड, रामहरी कोल्हे, ऑनकॅप्टन अनिल सपाटे, आदेश देशमुख, पत्रकार संतोष गालफाडे, पत्रकार श्रावणकुमार जाधव, पत्रकार मुब्बसीर खतीब, राहुल खोडसे, रोहित कसबे, गोपीनाथ इनकर यांच्यासह नागरिकांनी सहभाग नोंदवला.

# पाकधार्जिण्या अतिरेक्यांविरोधात बीड जिल्हा शिवसेना आक्रमक!

## पहलगाम पर्यटकांवर झालेल्या भ्याडहल्लयाचा शिवसेनेकडून जाहीर निषेध

बीड, प्रतिनिधी- जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या गोळीबार भ्याड हल्ल्यामुळे असंख्य निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला तसेच या घटनेमुळे देशभरात मोठ्या प्रमाणात दहशतीचे वातावरण निर्माण झाले. पाकधार्जिण्या अतिरेक्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ आज दुपारी 12.00 वाजताच्या दरम्यान धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र निषेध




आंदोलन करण्यात आले. दरम्यान संतप्त शिवसैनिकांनी अतिरेक्यांच्या फोटोला जोडे मारत मुडदाबाद मुडदाबाद पाकिस्तान मुडदाबाद अशा घोषणा दिल्या. भारत देश यशाची उंची गाठत असताना वारंवार पाकधार्जिन अतिरेकी दहशत पसरवण्यासाठी असे भ्याड हल्ले करतात. देशातील निष्पाप लोकांचे बळी घेतात. मात्र देशाची सुरक्षा यंत्रणा त्यांना शोधण्यासाठी कामाला लागलेली आहे. एक शिवसैनिक म्हणून माझी इच्छा आहे जिथे पाकधर्जिन अतिरेकी दिसतील तिथेच त्यांना गोळ्या घालव्यात ज्याने करून इथून पुढे कुणी आपल्या देशकडे डोळा वर करून पाहायची हिंम्मत करणार नाही. पाकधर्जिन अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा शिवसेनेकडून तीव्र जाहीर निषेश व्यक्त करण्यासाठी आम्ही शिवसैनिकांनी रस्त्यावर उतरून हे निषेश आंदोलन केले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी प्रसार माध्यमांना दिली. याप्रसंगी शिवसेना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या समावेत बीड जिल्हा शिवसेना, युवासेना, शेतकरी सेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेना, एसटी कामगारसेना तसेच सर्व अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

# शिरनेरच्या विरेंद्र मंडलिकची खेलो इंडिया युथ गेम्स कबड्डी स्पर्धेसाठी निवड

जालना/प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शिरनेर येथील रहिवासी व जालना जिल्हा क्रीडा प्रबोधिनीचा माजी कबड्डी खेळाडू तसेच सध्या बारामती स्पोर्ट अकॅडमीचा खेळाडू असलेल्या वीरेंद्र अरुण मंडलिकची 4 ते 8 मे रोजी बिहार येथे होणाऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कबड्डी संघात निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल विरेंद्रचे सर्वत्र अभिनंदन होत असून शिरनेर येथील जय मल्हार कबड्डी संघानेही त्याचे विशेष अभिनंदन केले आहे.विरेंद्रचे आई,वडील हे मजूरी करून त्याला कबड्डीसाठी घडवत आहे.वीरेंद्र हा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आज या स्थानावर पोहोचला आहे.



त्यामुळे त्याला पुढील यशस्वी वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा देण्यात येत आहे.

# पोलिसांना न सापडणाऱ्या अर्चना कुटे झुम मिटींग घेतात कशी :प्रा.सचिन उबाळे

## पोलिसांनी आर्थिक तडजोड केल्याचा आरोप; झुम मिटिंगमुळे उडाली खळबळ

बीड (प्रतिनिधी) बहुचर्चित ज्ञानराधा मल्टिस्टेटचे अध्यक्ष सुरेश कुटे यांच्या पत्नी आणि कुटे ग्रुपच्या चेअरमन अर्चना कुटे यांच्यावर ज्ञानराधा प्रकरणी गुन्हे दाखल झाले असून दीड वर्षांपासून पोलिस त्यांच्या शोधात आहेत. मात्र अर्चना कुटे पोलिसांना सापडत नाही. दरम्यान अर्चना कुटे यांनी २१ एप्रिल २०२५ रोजी झुम मिटिंग घेऊन ठेवीदारांशी संपर्क साधला असल्याचा प्रकार महाराष्ट्र ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन उबाळे यांनी उघडकीस आणला आहे. पोलिसांना न सापडणाऱ्या अर्चना कुटे झुम मिटींग घेतात कशी असा सवाल उबाळे यांनी उपस्थित करत पोलिसांनी अर्चना कुटेंबसोबत आर्थिक तडजोड केल्याचा आरोपही उबाळे यांनी केला आहे. दरम्यान अर्चना कुटे यांच्या झुम मिटिंगमुळे खळबळ उडली आहे. अर्चना कुटे यांच्या झुम मिटिंग संदर्भात प्रा.सचिन उबाळे म्हणाले की, आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट प्रकरणी सुरेश कुटे सध्या कारागृहात आहेत तर अर्चना कुटे यांच्यावर गुन्हे दाखल झाले असून त्या दीड वर्षांपासून फरार आहेत. त्या अद्यापही पोलिसांना सापडल्या नाहीत. असे असताना २१ एप्रिल रोजी कुटे यांच्या संपर्कात असलेल्या ठेवीदारानी एका ग्र ुपच्या माध्यमातून ठेवीदारांची झुम मिटिंग आयोजित केली आणि यात मिटिंगमध्ये आरोपी असलेल्या अर्चना कुटे यांनी ठेवीदारांशी संपर्क साधून पुन्हा एकदा ठेवीदारांची दिशाभूल केली. झुम मिटिंगमध्ये कुटे यांच्यावर काही ठेवीदारांनी प्रश्नाची तोफ डागली तेंव्हा प्रश्न विचारणाऱ्या ठेवीदारांना मिटिंगमधून रिमुव्ह करण्यात आले. या ठेवीदारांशी माझ्याशी संपर्क केला असल्याचे उबाळे यांनी सांगितले. दीड वर्षांपासून पोलिसांना सापडत नसलेल्या अर्चना कुटे झुम मिटिंग घेतात. मात्र पोलिसांना माहिती होत नाही. यावरुन पोलिस प्रशासन झोपले असल्याचे दिसून येते. एवढेच नाही तर अर्चना कुटे यांना अटक न करता त्यांना मोकळे सोडण्यासाठी पोलिसांनी अर्चना कुटे यांच्या सोबत आर्थिक तडजोड केल्याचा आरोप प्रा. उबाळे यांनी केला. ज्ञानराधावर शासनाने प्रशासकाची नेमणूक केली. मात्र प्रशासक जसा वेळ मिळेल तसे त्यांच्या सोयीने काम करत आहेत. दुसरीकडे एमपीआयडीचा प्रस्ताव महिनाभरापूर्वी मंजूर झाला. मात्र यावर नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी विशेष असे काम केले नाही.



यामुळे प्रशासनाचे नेमके काय चाललले आहे हे समजत नाही. उलट प्रशासनाला ठेवीदारांचे अजुन किती बळी घ्यायचे आहेत असा प्रश्न उबाळे यांनी विचारला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लवकरच आंदोलन : दिवाळखोरीत निघालेल्या ज्ञानराधासह सर्वच पतसंस्था, मल्टिस्टेट प्रकरणी सुरुवातीपासून महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीच्या माध्यमातून आम्ही आंदोलनातून आवाज उठविला. यामुळे जवळपास सर्वच चेअरमन, संचालक यांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र ठेवीदार कृती समितीच्या माध्यमातून १ हजार ६८ गुन्ह्यांचे पीटिशियन न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. एमपीआयडीचा प्रस्ताव दाखल झाल्यानंतर कुटेंच्या सर्व प्रॉपर्टीचा लिलाव होऊन ठेवीदारांच्या ठेवी परत मिळतील. दरम्यान आमचे आंदोलन कुठेही भरकटणार नाही. आंदोलन थांबलेले नाही. ठेवीदारांच्या प्रश्नासाठी येत्या आठ दिवसात पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पालकमंत्र्यांनी दखल घ्यावी असे तीव्र आंदोलन करणार असल्याचे प्रा.सचिन उबाळे म्हणाल

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### टेस्ला: रोजगार निर्मितीला चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्लाचे मालक इलान मस्क यांच्यात काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. या चर्चेचा सारांश भारतात टेस्लाचा प्रवेश निश्चित करण्याचा होता आणि त्या दृष्टीने दोन्ही प्रमुखांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला टॅरिफच्या धमकीने दहशतीत ठेवले असताना भारतीय पंतप्रधान अमेरिकन उद्योगपती मस्क यांच्याशी त्यांचा टेस्ला हा उद्योग भारतात विस्तारित करण्यासंदर्भात चर्चा करतो ही निश्चितच आशादायक बाब आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील उद्योगांमध्ये व्यापक चर्चा होऊ शकते आणि या दोन्ही बाबतीत प्रचंड वाव आहे, हे मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेतून स्पष्ट झाले आहे. जरी भारताचे अमेरिकेशी टॅरिफच्या मुद्यावरून संबंध बिघडलेले असले तरीही मोदी यांच्या म्हणण्यानुसार भारत अमेरिकेशी असलेली आपली भागीदारी पुढे नेऊ इच्छितो आणि मोदी यांनी हे स्पष्ट सांगितले आहे. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेला या अर्थाने महत्त्व आहे कारण मस्क हेच सध्याच्या ट्रम्प प्रशासनात प्रभावशाली व्यक्ती म्हणून समजले जातात. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे हे भारतासाठी प्रचंड लाभदायक ठरू शकते. टेस्लाचे भारतातील आगमन यामुळे निश्चित झाले आहे असे समजले जाते. भारतातील अन्य विरोधी पक्षांनी टेस्लाच्या आगमनासाठी काही वर्षांपूर्वी पायघड्या घातल्या होत्या. पण मस्क यांनी मोदी यांना पसंती दिली यावरून मोदी यांचे अमेरिकेशी आणि ट्रम्प यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध आहेत ते लक्षात येते. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेत अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली असे सांगण्यात आले. पंतप्रधान मोदी यांच्या स्वायत्ता धोरणाला प्रचंड महत्त्व आहे आणि भारताने कोणत्याही बाबतीत अमेरिकेच्या किंवा कोणत्याही देशाच्या दबावाखाली येऊन निर्णय घेतला नाही हे वास्तव आहे. भारताचे कोणत्याही देशाच्या दबावाखाली न येण्याचे धोरण लक्षात घेऊन मोदी वारंवार अनेक देशांचे दौरे करत असतात, पण काल मात्र त्यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. इलान मस्क यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून गणले जाते. मोदी आणि मस्क यांच्यात तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण संशोधन यावर चर्चा झाली. ही चर्चा फलद्रूप झाली तर त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी आत्यंतिक होणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था सध्या चांगल्या अवस्थेत असली तरीही तिच्यावर टॅरिफचे सावट आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी मस्क यांचा आधार भारताने शोधला तर त्यात वावगे काही नाही. टेस्लाच्या आगमनाने भारतीय बाजारपेठ उत्साहाने उचबंळून येणार आहे आणि भारतीय बाजारात नव्या गाड्यांचे आगमन होणार आहे आणि त्यामुळे सध्या जी बाजाराला विशेषतः विद्युत वाहनांच्या बाजारपेठेला मरगळ आली आहे ती जाणार आहे. त्यादृष्टीने मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेचे महत्त्व अपरंपार आहे. टेस्ला कार्स ज्या विद्युतवर चालतात त्यांच्या आगमनाची भारतात प्रचंड प्रतीक्षा आहे. त्यामुळे ही चर्चा जर खरोखरच यशस्वी झाली, तर भारतीय कार उद्योगासाठी ती क्रांती ठरेल. शिवाय मरगळलेल्या कार उद्योगासाठी टेस्लाचे आगमन ही सुखद वार्ता ठरेल, त्यादृष्टीने या चर्चेकडे सकारात्मक पद्धतीने पाहिले पाहिजे. पण त्यापेक्षा या चर्चेकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे ते सध्याच्या अमेरिकेच्या टॅरिफच्या धोरणाच्या संदर्भात. मोदी आणि मस्क यांच्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य सहकार्याबाबत चर्चा झाली ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या चर्चेनंतर टेस्लाचे भारतातील आगमन निश्चित मानले जात आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार आहे आणि अमेरिकेच्या जगभरात जो संताप व्यक्त होत आहे त्याला कुठेतरी आळा बसेल अशी दोन्ही देशांना आशा आहे. तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रात चर्चा झाली आणि त्यावर व्यापक सहमती होण्याची शक्यता आहे. मोदी यांच्यासारखा द्रष्टा पंतप्रधान लाभल्यामुळे देशाला कितीही मोठ्या संकटातून वाट काढून घेऊन जातो याचे हे उदाहरण आहे. या चर्चेचे फलित म्हणून या महिन्यात टेस्लाचे अधिकारी भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यात टेस्लाच्या आगामी आगमनासंबंधी तपशील निश्चित होईल. ही चर्चा त्यासाठीच होती असे सांगण्यात आले आहे. टेस्लाने भारतात तर भरती प्रक्रिया सुरू केली आहे अशीही चर्चा आहे. त्यामुळे विरोधक कितीही बोंबा मारोत किंवा भारताच्या सार्वभौमत्वासंदर्भात कितीही ओरड करोत, टेस्ला भारतात येणार आणि

# वेळेच्या नियोजनासाठी घड्याळाची गरज




जीवनात जे वेळेचे महत्त्व समजून घेत नाहीत ते जीवनात कधीही यशस्वी होत नाहीत. तेव्हा वेळेनुसार चालणारी माणसे त्यांच्या आयुष्यात यशस्वी होतात. त्यासाठी जीवनात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जगण्यासाठी जशी आपल्याला अन्नाची गरज असते तशी प्रत्येकाच्या जीवनात वेळेसाठी घड्याळाची आवश्यकता असते. जी व्यक्ती वेळेचे महत्त्व समजून घेते तीच व्यक्ती जीवनात यशस्वी होते हा निसर्गाचा नियम आहे. आपल्याला जीवनात यश संपादन करायचे असेल, तर वेळेचे नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. एकदा वेळ निघून गेली की परत येत नाही. तेव्हा प्रत्येकांनी आपल्या जीवनात वेळेचा दुरुपयोग न करता वेळेचे नियोजन करून त्याचे सोने करायला हवे. तरच आपण जीवनात यशवंत होऊ शकतो. त्यासाठी प्रत्येकांनी वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन आपली कामे करायला हवीत. विद्यार्थ्यांच्या जीवनात वेळेला खूप महत्त्व आहे. विद्यार्थी दशेमध्ये एकदा गेलेली वेळ परत येत नाही. तेव्हा वेळ वाया जाणार नाही या दृष्टीने विद्यार्थ्यांनी सुद्धा वेळेचे नियोजन करावे. यातच त्यांचे यश अवलंबून असते. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मुंबई, अमरावती, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा झालेल्या आहेत. कदाचित मे महिन्यामध्ये दोन्ही परीक्षांचे निकाल जाहीर होतील, तर काहींच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. तेव्हा विद्यार्थी मित्रांनी परीक्षेच्या दृष्टिकोनातून वेळेकडे दुर्लक्ष करू नये. आता दहावी आणि बारावीची परीक्षा संपली आहे. काही दिवस विश्रांती घेऊन नंतर पुढे बघू. वेळ कोणासाठीही थांबत नाही. जो थांबला तो संपला. आता परीक्षा संपली तरी निकालापर्यंत मिळणाऱ्या वेळेचे सोने करता आले पाहिजे. तोच जीवनात यशस्वी होतो. तेव्हा आतापर्यंत वेळेकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आता वेळेकडे लक्ष द्यावा. नंतर पश्चाताप करून घेण्यापेक्षा अजून वेळ निघून गेलेली नाही. त्यात वय सुद्धा वाढत असते. असे असते तरी आतापासून वेळेचे महत्त्व लक्षात घेऊन वेळेनुसार अभ्यासाकडे तसेच अवांतर वाचनाकडे लक्ष द्यावा. त्यामुळे परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे दडपण येणार नाही. माझे जिवलग मित्र किशोर राणे यांचे २३ एप्रिल, २०१७ रोजी कणकवलीमध्ये लग्न झाले तसे त्यांनी लग्नाचे निमंत्रण सुद्धा मला दिले होते. या घटनेला अजून चार दिवसांनी आठ वर्षे पूर्ण होतील; परंतु माझ्या विभागाच्या परीक्षा सुरू असल्यामुळे मला जाणे शक्यच नव्हते. तसे अंतरही एका दिवसामध्ये परत येणारे नव्हते. तशा त्यांना मोबाईलवरून लग्नाच्या शुभेच्छा सुद्धा दिल्या होत्या. त्यानंतर १३ मे, २०१७ रोजी त्यांना त्यांच्या कार्यालयात भेटून शुभेच्छा देऊन भेटवस्तू म्हणून घड्याळ दिले होते. त्यांनी त्याचा सन्मानपूर्वक स्वीकार केला. मला म्हणाले की, साहेब तुम्ही यायला हवे होते. त्यानंतर त्यांनी मला माझ्या मोबाईलवर संदेश पाठविला. त्या संदेशामध्ये किशोर राणे लिहितात की, ङ्कङ्कआपल्या भेटीने आम्ही आभारी आहोत. आपण आम्हाला वेळेची किंमत समजावून दिलीत. धन्यवाद खरच हे शब्द तरुण पिढीला प्रेरणा देणारे आहे. याचा अर्थ आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. कारण कोणत्याही गोष्टीचे नियोजन करीत असताना वेळेकडे पाहिले जाते. वेळेकडे पाहत असताना त्यात घड्याळाची प्रमुख भूमिका असते. कोणतेही काम वेळेत पूर्ण करायचे असेल, तर घड्याळ डोळ्यांसमोर असले पाहिजे. तरच आपण वेळेत काम पूर्ण करू शकतो. जीवनात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी घड्याळ खूप मोलाची भूमिका पार पाडीत असते. तेव्हा प्रत्येकाच्या जीवनात घड्याळाला महत्त्व आहे. आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल असला तरी प्रत्येकाच्या मनगटावर घड्याळ असते. त्यामुळे तो वेळ पाहून आपली कामे करू शकतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या जीवनात घड्याळ हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. घड्याळामुळे विद्यार्थ्यांना वेळ समजते. यामुळे अभ्यासासाठी वेळेचे नियोजन करणे सोपे जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी एक लक्षात ठेवले पाहिजे की, आपण वेळेसाठी नसतो, तर वेळ आपल्यासाठी असते. प्रत्येकांनी आपल्या मनगटातील घड्याळ फॅशन म्हणून त्याकडे पाहू नये, तर त्याचा वेळेसाठी योग्य प्रकारे उपयोग करावा. म्हणजे आपला वेळ वाया जाणार नाही. सध्या कडक उन्हाळा चालू असून अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. तेव्हा काही अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यावर मात करून पुढे गेले पाहिजे. मात्र घड्याळाकडे नजर ठेवावी लागेल. आज नको, उद्यापासून काम करू, उद्या नको परवापासून कामाला लागू असे करत असू तर वेळ वाया जात आहे. प्रत्येकाच्या जीवनात वेळ आणि घड्याळाला महत्त्व आहे. ज्याप्रमाणे माझे मित्र किशोर राणे यांनी जसे घड्याळामुळे आम्हाला वेळेची किंमत समजली असे लिहिले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये वेळ घालवीत वेळ वाया घालविण्यापेक्षा वेळेचा चांगल्या कामासाठी वापर करावा. त्यासाठी घड्याळाचा योग्यप्रकारे वापर करावा. बऱ्याच वेळा परीक्षागृहात घड्याळ नसते. स्पर्धात्मक परीक्षांसाठी घड्याळ परीक्षा केंद्रात आणण्यास परवानगी नसते. अशा वेळी प्रत्येक परीक्षागृहात घड्याळ असावे. काही ठिकाणी घड्याळ असून बंद अवस्थेत असताना दिसतात. ती परीक्षेपूर्वी दुरुस्त करून चालू करण्यात यावीत. तेव्हा जीवनात यशवंत होण्यासाठी वेळेच्या नियोजनासाठी घड्याळाची नितांत गरज असते हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या पाठपुराव्याला यश! कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

परळी वैजनाथ प्रतिनिधी उन्हामुळे निर्माण झालेली उष्णता आणि त्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी प्रशासनाकडे करून त्यासंदर्भात मोठी लढाई उभारण्याचा इशारा दिला होता. यासंदर्भात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेऊन ग्रामस्थांना सोबत घेऊन रास्तारोको आंदोलन करणार असल्याचेही त्यांनी कळवले होते. याचीच दखल घेऊन आज मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला तत्काळ पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी मागील एक महिन्यापासून राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. पाणी न सोडल्यास कन्हेरवाडी येथे परळी - अंबाजोगाई महामार्गावर रास्तारोको आंदमलन करण्याचा इशारा दिल्याने अखेर प्रशासनाला मागणी मान्य करावी लागली असून, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यासंदर्भात अध्यादेश काढून पाणी सोडण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. या प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात येणार असल्यामुळे कन्हेरवाडी गावासह आजूबाजूला असलेले जिरेवाडी, जलालपूर, शंकर पार्वती नगर, बँक कॉलनी आदी भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असून जनावरांच्याही पाण्याची सोय झाली आहे. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यासाठी राजेभाऊ फड यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळेच या मागणीला यश आल्यामुळे नागरिकांच्या वतीने त्यांचे आभार मानले जात आहेत. कन्हेरवाडीत फटाके फोडून आनंदोत्सव उन्हामुळे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे आणि पशु पक्षांचे हाल होत होते. यामुळे कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे यासाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने त्यांच्या मागणीला यश आले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पाणी सोडण्याचे आदेश दिल्यानंतर गावात फटाके फोडून जल्लोष करण्यात आला.

# छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक नांदेड शहरात बनवा सकल मराठा समाजाकडून पालकमंत्र्यांना निवेदन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : नांदेड जिल्हा हे चळवळीचे केंद्र बिंदू असुन या जिल्ह्यात प्रत्येक महापुरुषांच्या आदर्शाने सर्व समाजातील समाज बांधव आप आपली चळवळ चालवत असतात, प्रकर्षाने नांदेड शहरात अनेक महापुरुषांचे स्मारकं आहेत परंतु शहरात कुठेही छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक नाही. या अनुषंगाने जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अतुल सावे हे नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देत सविस्तर चर्चा करण्यात आली, की महामानवांच्या विचारांना त्यांच्या स्मृतीला किमान जयंती पुण्यतिथीच्या दिनी तरी अभिवादन करण्यासाठी त्यांचे स्मारक हे शहरात असणे गरजेचे आहे. नांदेड शहर हे शिक्षणाचे हब बनले असुन या शहरात शिक्षण घेण्यासाठी बाहेर गावातून तसेच अनेक ग्रामीण भागातून कित्येक विद्यार्थी विद्यार्थिनी येत असतात अशा शालेय व महाविद्यालयीन जिवनात ज्या महापुरुषांच्या विचारांना त्यांच्या स्मृतीना आपण उजाळा देतो त्यांचाच प्रभाव आपल्या भविष्यावर पडत असतो मग अशा वेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रखर शौर्याचा आणि पराक्रमाचा इतिहास तमाम नांदेडकरांच्या जिवनाला भेदावा त्यांच्या प्रचंड त्यागाला बलिदानाला चिरंतर स्मरून त्यांना अभिवादन करता यावं यासाठी नांदेड शहरात भव्य असं छत्रपती संभाजी महाराज यांचं स्मारक उभं राहावं अशी इच्छा तमाम नांदेड करांची आहे,



यावर आपण पालकमंत्री म्हणुन योग्य ती भुमिका घेत येत्या १४ मे २०२५ पर्यंत म्हणजेच छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती पर्यंत नियोजित जागा पाहुन त्याचे भूमिपूजन करावं अन्यथा येत्या काळात नांदेड जिल्ह्यातील शिव-शंभूराजे भक्तांकडून महाराजांचा पुतळा बसवण्यात येईल. यावेळी निवेदनावर दशरथ पाटील कदम,श्याम पाटील वडजे,सुभाष पाटील कोल्हे,संकेत पाटील,सुनिल पाटील कदम,दिलीप पाटील दळवे, नवनाथ जोगदंड यांच्या स्वाक्षरी आहेत.

## जाधव परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाची मदत; रणवीर पंडित यांच्या हस्ते धनादेशाचे वाटप

गेवराई - जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचेकर्मचारी स्वर्गीय सुरेश जाधव यांच्या परिवाराला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाच्या वतीने आर्थिक मदतीचे वाटप शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना विविध आजारात मदत केली जाते तसेच सेवेत निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या परिवारालाही आर्थिक मदतीचे वाटप करण्यात येते. जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी येथील पर्यवेक्षक जाधव सुरेश भिमराव यांचे अल्पशा आजाराने निधन झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळ गेवराई कडून आर्थिक मदतीसाठी एक लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या हस्ते आर्थिक मदतीचा धनादेश जाधव परिवाराला देण्यात आला. यावेळी साने गुरुजी कर्मचारी कल्याण मंडळाचे अध्यक्ष भागवतराव राऊत, मंडळाचे व्यवस्थापक श्रीराम शेळके, रामपूरी विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक तौर माजी मुख्याध्यापक बाबुराव टकले, माजी क्रिडा शिक्षक भवार यांच्यासह कार्मचारी उपस्थित होते.

## विष्णुपुरी प्रकल्प कावलगाव सर्कल बाधित शेतकऱ्यांच्या संघर्षाला अखेर यश



विष्णुपुरी प्रकल्प कावलगाव सर्कल बाधित शेतकरी कृती समिती च्या वतीने करण्यात आलेल्या आंदोलनाला, संघर्षाला अखेर यश आले. उद्या दि. 24-4-025 गुरुवार रोजी कावलगाव सर्कल मधील आलेगाव, कावलगाव, कावलगाववाडी, धानोरा(मोत्या), पेनूर, सातेफळ येथील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी विष्णुपुरी प्रकल्पात जाऊन बाधित होतात अशा शेतकऱ्यांच्या बाधित होणाऱ्या जमिनी चे भूसंपादन करून मोबदला देण्यासाठी शासनाकडे पाहणी करून अहवाल पाठवावयाचा आहे. यासाठी विष्णुपुरी प्रकल्प नांदेड चे खालील अधिकारी --वरील गावांना भेटीदेऊन पाहणी करणार आहेत. 1)ए.के.कलवले साहेब -उपविभागीय अभियंता. 2)एम.जी.शेख साहेब -उपविभागीय अधिकारी. 3)के.एन.राजकुंठवार साहेब -सहायक अभियंता श्रेणी 2. 4)पोनम साहेब हे अधिकारी उद्या सकाळी 8वाजता आलेगाव, सकाळी 9:30वाजता कावलगाव, सकाळी 10:30वाजता कावलगाव वाडी, सकाळी 11:30वाजता धानोरा मोत्या, दुपारी 12:30वाजता पेनूर, दुपारी 2वाजता सातेफळ या गावाना भेटी देऊन पाहणी करणार आहेत. त्या त्या गावातील ज्यांच्या जमिनी विष्णुपुरी प्रकल्पात जाऊन बाधित होतात अशा संबंधित सर्व शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे. :- बळीराम कदम अध्यक्ष :- विष्णुपुरी प्रकल्प कावलगाव सर्कल बाधित शेतकरी कृती समिती.

# अंबड-घनसावंगी प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेला ३ कोटी २५ लाखाचा विक्रमी नफा

जालना/प्रतिनिधी अंबड-घनसावंगी तालुका जि.प. प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेला आर्थिक वर्ष 2024 -2025 मार्च अखेर 3 कोटी 25 लाख रुपयाचा ढोबळ नफा झाला असून सर्वांच्या सहकार्यामुळे पतसंस्थेला हा विक्रमी नफा झाल्याची माहिती संस्थेचे चेअरमन महादेव वैराळ व सचिव दत्ता वाघमारे यांनी दिली. विशेष म्हणजे हा आता पर्यंतचा सर्वाधिक नफा असून पतसंस्थेच्या भाग भांडवलामध्येही भरीव वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले. अंबड-घनसावंगी तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्यावतीने पारदर्शक कारभाराद्वारे सभासद हिताच्या अनेक योजना राबविल्या जात आहेत.यामुळे पतसंस्थेचा नावलौकिक जिल्हा पातळीवर तसेच राज्य पातळीवरही वाढला आहे. सभासदांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी भरीव आर्थिक तरतूद करून सभासदांना जास्तीत जास्त लाभांश वितरित करण्याचे चेअरमन, सचिव तसेच विद्यमान संचालक मंडळाने प्रस्तावित केले आहे. संचालक मंडळाने थकबाकी वसुली संदर्भात घेतलेली कणखर भूमिका यामुळे पतसंस्थेची प्रगती वृद्धिगत झाली असून या सर्व वाटचालीमध्ये पतसंस्थेचे चेअरमन महादेव वैराळ, व्हाईस चेअरमन रत्नमाला मुळे, सचिव दत्ता वाघमारे, ज्येष्ठ संचालक सुभाष चाटे,संतोष राजगुरू, श्रीमती वैशाली भिसे, उद्धव बाजड, संदिपान जाधव, उद्धव खांडेभराड , हरिभाऊ भोसले, विनोद आरसूळ, कल्याण वाघमारे, उद्धव बिल्लारे, अमोल वराडे, ईश्वर गाडेकर आदी सर्व संचालक मंडळ तसेच सर्व सभासद, पतसंस्थेचे व्यवस्थापक मनोज वैद्य, प्रशासकीय अधिकारी भिमराव सावंत,लिपिक दिगंबर जऱ्हाड, कृष्णा वीर, पवन चाटे, सेवक भैय्यासाहेब वाहुळे या सर्व मंडळीचे मोलाचे सहकार्य मिळाले असल्याचेही पतसंस्थेचे चेअरमन महादेव वैराळ व सचिव दत्ता वाघमारे यांनी सांगितले.



## भ्याड दहशतवादी हल्याचा जाहीर निषेध -नितीन धांडे



जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे आज काही पर्यटकांवर भ्याड दहशदवादी हल्ला झाला.या अमानवी कृत्यात २६ पेक्षा जास्त निष्पाप पर्यटक नागरिकांनी आपला जीव गमावला.हा दहशदवादी हल्ला अतिशय निंदनीय तसेच हृदय पिळवटून टाकणारा आहे. या हल्ल्यात दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्यांना भावपुर्ण श्रद्धांजली व या हल्ल्यात जखमी झालेल्यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी हि ईश्वरचरणी प्रार्थना..



**बीड नगरपरिषद मध्ये भागवत जाधव यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची विभागीय चौकशी करावी अशी मागणी उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना मुकुंद भोसले यांनी पुण्यामध्ये निवेदन देण्यात आले व अजित दादांनी याची चौकशी करू असे आश्वासन दिल**

# वाचन संस्कृतीचे जतन करणे गरजेचे आहे डॉ.शिवाजी यादव

पाचोड प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे




पाचोड ---शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये जागतिक वाचन दिन साजरा करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. शिवाजी यादव हे उपस्थित होते तर अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे यांनी भूषविले डॉ.यादव विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की सोशल मीडियाच्या युगामध्ये आज वाचन संस्कृती कुठेतरी लोप पावत चालली असून ती संस्कृती जतन करण्याचे कार्य हे शिक्षकांच्या हाती आहे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, आवड निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात किमान दिवसातून एक तास तरी दिला पाहिजे सामाजिक, राजकीय, धार्मिक ऐतिहासिक, सांस्कृतिक विषयावरील पुस्तके वाचन केली पाहिजे अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.कोठावळे म्हणाले की ग्रंथ हेच गुरु मानून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास घडवण्यासाठी वाचन संस्कृतीकडे वळले पाहिजे सोशल मीडियाच्या दुनियेतून बाहेर येऊन पुस्तकाच्या दुनियेत वळले पाहिजे पुस्तकांना मित्र करून आपण जास्तीत जास्त पुस्तके वाचन करावी महापुरुषांची चरित्र, आत्मचरित्र वाचली पाहिजे वाचनामुळे ज्ञानामध्ये भर पडते व व्यक्तीला सामाजिक भान येते चांगल्या वाईट गोष्टीची समज येते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले तर आभार डॉ.विलास महाजन यांनी

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांचा वाढदिवसा साजरा



सिंधीकाळेगाव/प्रतिनिधी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना बबनराव मोहिते, फाकिरराव मोहिते,भगीरथ बापू मोहिते.उमेश मोहिते राष्ट्रवादी युवक कॉग्रेस पार्टी तालुकाध्यक्ष जालना छायाचित्रात दिसत आहे.

# जागतिक वसुंधरा दिवस.

( मानोरा ता. प्र.किरण जैन.) आपली पृथ्वी म्हणजेच वसुंधरा. तिची काळजी घेण्याची जबाबदारी ही आपल्या प्रत्येकाची आहे. त्यासाठी जगभरात दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस जागतिक वसुंधरा दिवस म्हणून साजरा केला जातो. हवामान बदलामुळे दिवसेंदिवस वाढते तापमान, अवकाळी पाऊस असे हवामान बदल जाणवत आहेत हेच हवामान बदलांची स्वरूप दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. या बदलांना रोखण्यासाठी या बदलांना रोखण्यासाठी योग्य पावले उचलणे गरजेचे आहे. ऊर्जा निर्मितीसाठी कोळसा पेट्रोल डिझेल यांचे ज्वलन केले जाते त्यामुळे हवा आणि पाणी यांचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते त्यावर नियंत्रण मिळविणे काळाची गरज आहे. ऊर्जा निर्मितीसाठी जीवाश्म जनावरील अवलंबित्व कमी करून मी करून पर्यायी संसाधनांचा वापरावर अधिक भर द्यावा लागेल त्यासाठी सौर ऊर्जा पवन ऊर्जा यांचा वापर महत्त्वाचा आहे. याशिवाय हवा आणि पाण्याचे प्रदूषण वाढत आहे. रस्त्यावरील वाहनांची वाहनांची वाढती





संख्या, कारखान्यांमधून हवेत सोडण्यात येणारे विषारी वायू उद्योगधंदे जंगलतोड वनवे शेतातील शिल्लक पीक औषध जाळणे इत्यादीन कारणांमुळे हवा प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे तसेच नदीमध्ये सोडले जाणारे सांडपाणी कारखान्यातून कोणतेही प्रक्रिया न करता थेट नद्या समुद्रांमध्ये जोडण्यात येणारे विषारी पाणी प्लास्टिक कचरा अशी विविध कारणे पाणी प्रदूषण होण्यामागे आहेत.हवा आणि पाण्याच्या वाढत्या प्रदूषणामुळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे यावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वांनी वसुंधरा दिनाच्या निमित्ताने एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. हवामान बदलामुळे हवामान दिवसेंदिवस वाढते तापमान, अवेळी अवकाळी पाऊस असे हवामान बदल जाणवत आहेत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी वेळीच पावले उचलण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वांना जागृत करण्यासाठी जगभरात २२एप्रिल हा दिवस 'जागतिक वसुंधरा दिवस ' म्हणून साजरा केला जातो.

## वि.सा.स चे कार्यकारी विश्वस्त श्री.तुषार रंजनकर यांच्या हस्ते 'यशस्वी नोकरीसाठी दिशादर्शक'चे प्रकाशन – तरुणांसाठी नवदिशा




पुणे येथील नामांकित विद्यार्थी सहाय्यक समितीच्या मुख्य कार्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये "यशस्वी नोकरीसाठी दिशादर्शक" या पुस्तकाचे प्रकाशन दि. १९ एप्रिल २०२५ रोजी विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त श्री. तुषार रंजनकर यांच्या हस्ते संपन्न झाले. लेखिका डॉ. ज्योती गोगटे लिखित या पुस्तकात तरुणांना नोकरी मिळविण्याच्या प्रवासात आवश्यक असणारे सर्व टप्पे – स्व-आकलन, योग्य करिअर निवड, प्रभावी रिझ्युमे, मुलाखत तयारी, वैयक्तिक ब्रँडिंग व नेटवर्किंग – यांचे सखोल आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन दिले आहे. 'शिक्षण ते कमाई' या संकल्पनेवर आधारित पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठही विशेष दाद मिळवून गेले. रुद्र पब्लिकेशनमार्फत प्रकाशित हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून, नोकरीच्या वाटचालीसाठी एक विश्वासू साथीदार ठरणार आहे, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. हे पुस्तक डॉ.ज्योती गोगटे यांनी समितीच्या विद्यार्थ्यांना अर्पण केले आहे. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल प्लेसमेंट सेलचे विशेष कौतुक करण्यात आले. या प्रकाशनप्रसंगी वि.सा.समितीचे कार्यकारी विश्वस्त श्री.तुषार रंजनकर, लेखिका डॉ.ज्योती गोगाटे,श्री. संजय अमृते, श्री.नवनाथ जगताप व सुप्रिया केळवकर उपस्थित होते.

## अदिबा अनम: यवतमाळची कन्या ठरणार महाराष्ट्रातील पहिली मुस्लिम महिला IAS अधिकारी



यवतमाळ (विक्रांत शिरसाट): यवतमाळच्या अदिबा अनम अशफाक अहमद हिने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC 2024) अंतिम निकालात थेट यश मिळवत देशात १४२ वा क्रमांक पटकावला आहे. अवघ्या २३ वर्षांच्या वयात हे यश संपादन करून तिने केवळ यवतमाळ नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव वाढवला आहे. अदिबा अनम ही महाराष्ट्रातील पहिली मुस्लिम महिला IAS अधिकारी बनण्याच्या मार्गावर असून, तिचे हे ऐतिहासिक यश संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. कठोर मेहनत, आत्मविश्वास आणि सातत्याच्या बळावर तिने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. 'शब्दभूमी न्यूज' कडून अदिबा अनम हिला मन:पूर्वक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा

# येणारे तीन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण, दमट हवामान राहण्याची शक्यता. जिल्हा प्रतिनिधी:-किशन चुंचलवाड

नांदेड :-दि. 23 एप्रिल :- प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दिनांक 23, 24 व 25 एप्रिल 2025 हे तीन दिवस येलो अलर्ट जारी केलेला आहे. या तीन दिवसांच्या काळात जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. याबाबत खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी केले आहे. काय करावे सर्वांसाठी अत्यावश्यक · तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. · ओआरएस म्हणजेच तोंडान घ्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाच पाणी घ्या. हलक्या रंगाचे, वजनाला हलके आणि सैलसर सुती कपडे वापरा. · घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी घाला किंवा छत्री वापरा. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीन वापरा. · अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक हानी पोहोचेल असे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी किंवा स्थूल व्यक्तींची विशेष काळजी घ्या. नोकऱ्या देणारे आणि कामगार यांच्यासाठी · कामाच्या जागी पिण्याचे थंड पाणी पुरवा. · सर्व कामगारांसाठी विश्रांतीसाठी जागा, स्वच्छ पाणी, ताक, प्रथमोपचार पेटी, आईस पॅक आणि ओआरएसही ठेवा. · थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात यायचे टाळा, हे कामगारांना बजावा. · कामाची आखणी अशी करा की, ताणाच्या श्रमाच्या कामांसाठी दिवसातला तुलनेने कमी वेळ निवडला जाईल. · उघड्यावर काम करणाऱ्यांना विश्रांतीच्या वेळा अधिक ठेवा आणि कालावधीही वाढवा. · अतिउष्णतेच्या क्षेत्रात नव्याने काम करत असलेल्या कामगारांना हलके काम द्या, कामाचे तास कमी ठेवा. · गरोदर महिला आणि आजार असलेल्या कामगारांकडे अधिक लक्ष द्या. तुलनेनं थंड घरासाठी · सूर्यप्रकाश परावर्तित करणारा पांढरा नग वापरा, छत थंड ठेवणारं तंत्रज्ञान, हवेशीर, हलके, थर्मोकोलचे आवरण वापर ज्याद्वारे कमी किमतीत थंडपणा राखता येईल. छतावर गवत वाढवा किंवा हिरवेगार होईल हे बघा. · उष्णता बाहेरून आत येण्याऐवजी टी बाहेरच फेकली जावी, यासाठी तात्पुरते अल्युमिनियम आच्छादित पुठ्ठ्यांसारखे परावर्तक खिडक्यांवर बसवा. · घर थंड ठेवा, गडद रंगाचे पडदे वापरा. रात्री काळ्या काचा, उन्हापासून बचावाची सोय असलेली छते, खुल्या खिडक्या असू द्या. शक्यतो सर्वात खालच्या मजल्यावरच राहा. ·हरित छप्पर, हरित भिंती, घरांतर्गत वनस्पती इमारत नैसर्गिकरीत्या थंड बनवून उष्णता कमी करतात. त्याद्वारे वातानुकूलन यंत्रणेचा वापर कमी होऊन उष्णताही बाहेर फेकली जात नाही. · वातानुकूलन यंत्राचे तापमान २४ डिग्री अंश किंवा त्यापेक्षा जास्त ठेवा. यातून विजेचे बिलही कमी येईल आणि आरोग्यही चांगले राहील. पशुधनासाठी · पशुधन सावलीच्या छताखाली ठेवा आणि त्यांना भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्या. ·त्यांच्याकडून सकाळी 11 ते दुपारी 4 काम करून घेऊ नका. · प्राण्यांच्या आसऱ्याच्या ठिकाणी छतावर स्ट्रॉच्या नळ्यांनी आच्छादन करा, त्याला पांढरा रंग द्या किंवा शेणाच्या प्लास्टरद्वारे तापमान कमी करा. · पशुधनाच्या शेडमध्ये पंखे, पाण्याचे फवारे आणि फेस तयार करणारे यंत्र वापरा. · अतिउष्णतेच्या वेळी पाण्याचे फवारे मारा आणि प्राण्यांना जवळच्या पाण्याच्या स्रोतावर थंड करण्यासाठी न्या. · त्यांना हिरवे गवत, प्रोटीन फॅटला फाटा देणारा पूरक आहार द्या, मिनरल्सचे मिश्रण आणि मीठ द्या. तुलनेनं थंड हवेत त्यांना चरू द्या. काय टाळावे · उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. · अनवाणी बाहेर जाऊ नका. · अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. दारं खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकघर हवेशीर राहील हे बघा. · अल्कोहोल म्हणजे दारू, चहा, कॉफी, शीतपेये टाळा त्यातून शरीरातले पाणी कमी होते. · उच्च प्रथिनयुक्त मिठाचं प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळंपाकं खाऊ नका. · चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका. ·

# डॉ आकाश पुंजाराम गोरे याची स्पर्धा परीक्षेत यश सावता महासंघाच्या वतीने सत्कार

जालना प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे भाटेपुरी येथील श्री पुंजाराम गोरे यांचे सुपुत्र डॉक्टर आकाश पुंजाराम गोरे यांची (upsc) आयपीएस पदी निवड झाल्याबद्दल सावता महासंघाचे संस्थापक अध्यक्ष श्री संतोष (अण्णा ) डोंगरखोस यांनी भाटेपुरी येथे त्यांच्या मुळगावी सत्कार केला.

याप्रसंगी जि प माजी सदस्य श्री यादवराव राऊत सावता महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्री तुकाराम गोरे जिल्हा युवक अध्यक्ष श्री राजूभाऊ फुलझाडे जिल्हा युवा संघटक श्री निवृत्ती गोरे सामाजिक कार्यकर्ते सुनील दाजी खेत्रे नारायण गोरे कैलास गोरे यांच्यासह गावातील समाज बांधव व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी आकाश गोरे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल गावकऱ्यांनी त्यांच्या मूळगावी भव्य मिरवणूक काढून जंगी स्वागत केले. यावेळी माजी सरपंच अशोक राऊत, सरपंच सतीश गावडे, उप सरपंच सुंदर आटोळे, संदीप गाढे,तुळशीराम गोरे, प्रल्हाद गाढे, विठ्ठल घोलप,शेषनारायण गोरे,विठ्ठल बोंद्रे, कचरू वाघमारे, अमोल गोरे, विकास गोरे, कृष्णा गोरे, करण गोरे, रामेश्वर गोरे, बळीराम गोरे,बालाजी गोरे, भगवान गोरे, सोपान गोरे, गणेश गाडेकर, दीपक लोखंडे, शाम खोमणे, दत्ता कावळे, भगवान अनपट, शाम पाझाडे, प्रमोद पाझाडे, बळीराम गोरे,अमोल गाढे, माऊली गाढे,



गणेश चौधरी, अशोक गोरे, अभिमन्यू गाढे, भाऊसाहेब कावळे, सुमित आटोळे, बद्रि गाढे,अनिल चौधरी, भाऊसाहेब चोरमारे, कैलास महाराज बोंद्रे, हनुमान गायकवाड, सुखदेव कावळे, गणेश गाढे, प्रल्हाद आटोळे यांच्यासह गावातील नागरिक महिला मंडळी उपस्थित होते त्यांच्या यशाबद्दल जिल्ह्यातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे..

## माळी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा लातूर येथे संपन्न




*विदर्भ प्रतिनिधी सुधीर ढगे माळी सेवा संघ महाराष्ट्र व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद लातूर यांच्या वतीने आयोजित 6 वा राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर परिचय मेळावा 2025 दयानंद कॉलेज सभागृह लातूर येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करून सुरु झाला.*

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष मा.श्री. मकरंदजी सावे साहेब हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विशेष कार्य अधिकारी मा. श्री. मधुकर गुंजकर साहेब, OMW लॉजिस्टिक प्रा. लि. चे संचालक मा. श्री. मदन वाघमारे साहेब, लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. सुरेश कुमार राऊत साहेब हे उपस्थित होते.

मंचावर कार्यक्रमाचे आयोजक माळी सेवा संघ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे लातूरचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. पद्माकर वाघमारे सर, सचिव मा. श्री. भारतजी काळे साहेब, कोषाध्यक्ष मा. श्री. तुळशीदास गोंदरकर साहेब, विभागीय अध्यक्ष मा. प्रा. अभिमन्यू पाखरसांगवे सर, महिला आघाडीच्या राज्य अध्यक्षा सौ. अनिताताई फुटाणे मॅडम, कार्याध्यक्षा सौ. मायाताई गोरे मॅडम वधू वर परिचय समितीचे अध्यक्ष मा. श्री.पापासाहेब यादव साहेब हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मकरंद सावे साहेब यांनी माळी समाजातील मुला मुलींनी अधिकाधिक उच्च शिक्षण घ्यावे, चांगले उद्योग, व्यवसाय करावा उत्तम शेती करावी. समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम करावे आणि जेंव्हा जेंव्हा माझी गरज पडेल तेंव्हा तेंव्हा मी आपली मदत करण्यासाठी तत्पर असेन असे आश्वासन दिले.

या कार्यक्रमात महाराष्ट्रातील अनेक वेगवेगळ्या जिल्ह्यातून नवं इच्छुक वधू वरांनी मोठ्या संख्येने नोंदणी केली होती. अनेक मुला-मुलींनी स्वतः मंचावर आपला परिचय दिला. अनेक समाज बांधवांच्या गाठीभेटी झाल्या. हा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून माळी सेवा संघ, महाराष्ट्रचे महाराष्ट्रातील सर्व जिल्हाप्रमुख, लातूर जिल्ह्यातील सर्व तालुकाप्रमुख, माळी सेवा संघ महाराष्ट्राचे सर्व विभाग प्रमुख, राज्य महिला आघाडीचे सर्व पदाधिकारी, माळी समाज बांधव यांनी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारत काळे साहेब यांनी केले, सूत्रसंचलन बालाजी चौधरी सर आणि वंजे मॅडम यांनी केले तर आभार दत्तात्रय दापके सर यांनी मानले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २४ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


# करुणा शर्मा यांचा वाल्मिक कराडबद्दल आतापर्यंतचा सर्वात खळबळजनक दावा

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड हा सध्या कोठडीत आहे. वाल्मिक कराडला तुरुंगात मारहाण झाल्याचे वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आले होते. त्यानंतर एकच खळबळ उडाली होती. त्यातच आता करुणा शर्मा यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. मला ज्याप्रमाणे मारहाण झाली होती, त्याच प्रमाणे वाल्मिक कराडला जेलमध्ये मारहाण झाल्याची माहिती माझ्या सूत्रांनी दिली आहे, असा धक्कादायक दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. वाल्मिक कराडला जबर मारहाण "वाल्मिक कराडला तुरुंगात मारहाण करण्यात आली. त्याची दहशत आता संपली आहे. ज्याप्रमाणे मला मारहाण झाली होती, त्याचप्रमाणे वाल्मिक कराडलाही जेलमध्ये मारहाण झाल्याचे माझ्या सूत्रांनी सांगितले आहे. जेलमध्ये आठवले नावाच्या व्यक्तीने वाल्मिक कराडला जबर मारहाण केली आहे", असा दावा करुणा शर्मा यांनी केला आहे. वाल्मिक कराडला जेलमध्ये भेटायला जाणार "मी बीडमध्ये आल्यानंतर शपथ घेतली होती की वाल्मिक कराड



आणि धनंजय मुंडे यांची दहशत संपवून टाकेन. पण आता लवकरच मी वाल्मिक कराडला जेलमध्ये भेटायला जाणार आहे. त्याने ३२०० लोकांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवून तुरुंगात पाठवले आणि आता तो स्वतः त्याच तुरुंगात आहे," असेही करुणा शर्मा म्हणाल्या. "वाल्मिक कराडला जेलमध्ये व्हीआयपी ट्रीटमेंट" "वाल्मिक कराडला भेटण्यासाठी मी प्रशासनाकडून परवानगी मागणार आहेत. वाल्मिक कराडला बाहेरून जेवण येते. त्याला झोपण्यासाठी पलंगाचीही सोय करण्यात आली आहे. 60 वर्षांचा माणूस जेलमध्ये बसून दहशत पसरवत आहे. वाल्मिक कराडला जेलमध्ये व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे. प्रशासन नेमके काय करत आहे," असा सवाल करुणा शर्मा यांनी केला आहे.

### "वाल्मिक कराडची दहशत संपली"

"माझी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती आहे की त्यांनी कारागृहातील सीसीटीव्ही फुटेज काढावे, ज्यात त्यांना सत्य परिस्थिती कळेल. त्यामध्ये सर्व काही समजेल. आता वाल्मिक कराडची दहशत संपली आहे. आज धनंजय मुंडे मंत्री नसतानाही प्रशासन काही कारवाई करत नाही", असेही करुणा शर्मा यांनी म्हटले.

# निवृत्त पोलीस उप महानिरीक्षक अशोक धिवरे यांचा घोलप क्लासेसमधील विद्यार्थ्यांशी संवाद

बीड : बीडच्या शिक्षण क्षेत्रामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वैचारीक बारसा चालवणारे श्री. अशोक घोलप यांच्या शिक्षण संकुलाला काल दि.२१ एप्रिल रोजी राज्याचे पोलीस उप महानिरीक्षक (निवृत्त) श्री. अशोक धिवरे यांनी भेट दिली. त्यांच्या हस्ते २० गरजू विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. त्याच बरोबर इतरही अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. श्री. अशोक घोलप यांनी सामाजिक जाणिवेतून सुरु केलेल्या घोलप क्लासेसच्या माध्यमातून आजपर्यंत ५०० हून अधिक मुला-मुलींना मोफत सायकलचे वाटप केले आहे. एव्हडेच नाही तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या असंख्य विद्यार्थ्यांना या क्लासेसमध्ये दरवर्षी मोफत शिक्षण दिले जाते. त्यामुळेच बीड शहरातील अत्यंत नावाजलेल्या या क्लासेसला मोठ्या प्रमाणात समाज मान्यता मिळालेली आहे. अलीकडे खाजगी कोचिंग क्लासेसच्या माध्यमातून जी आर्थिक नफेखोरी केली जात आहे त्यामध्ये घोलप क्लासेस अपवाद ठरले असून त्यांनी आपली आई स्व. इंदिराबाई घोलप यांच्या स्मृती प्रित्यर्थ फार मोठे सामाजिक आणि शैक्षणिक दायित्व निभावलेले आहे. दि.२१ एप्रिल रोजी बीडचे



अत्यंत नावाजलेले पोलीस अधिक्षक आणि पोलीस उप महानिरीक्षक पदावरुन निवृत्त झालेले श्री. अशोक धिवरे यांनी आवजु न घोलप क्लासेसला भेट दिली. विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला. या प्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाला दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक बी.एम. डिकले पाटील, पोलीस उपनिरीक्षक सुर्यकांत टाकळे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वडमारे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा अर्चना झोडगे, वैशाली पाठक, तुळशीराम जगताप, राजाभाऊ धांडे, अभिमान भालेराव, राजू वडमारे, किशोर इंगोले, अनुसया फड, बाळासाहेब फड, परमेश्वर फड आदी उपस्थित होते.

# रबी अहमदला नाशिकमध्ये तिसरे राष्ट्रीय रौप्य पदक

बीड - वर्ल्ड बॉक्सिंग कौन्सिल, जागतिक मुआय थाय फेडरेशन इंडिया आणि ऑल इंडिया मिक्स्ड मार्शल आर्ट्स फेडरेशन इंडिया यांच्या मान्यतेने प्रायमल कंट ेन्डर सिरीज २ आणि नाशिक एमएमए क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एमएमए फायटिंग नॅशनल चॅम्पियनशिप २०२५ मध्ये मिल्लीया सीनिअर कॉलेज चे शेख रबी अहमद शेख अब्दुल रहीम (गुलाम साकिब) यांना रौप्य पदक मिळाले. ते केरळच्या सियाम वॉरियर फाईट क्लबकडून खेळत होते, तर त्यांची लढत गोवा येथील रहीम फायटर फॅक्टरी क्लबचे सर्वोत्तम गोल्ड मेडलिस्ट सोनू शर्मा यांच्याशी झाली. या सामन्यात सोनू शर्मा यांना सवर्ण आणि रबी अहमद याला त्यांचा करिअरचा तिसरा राष्ट्रीय रौप्य पदक मिळाला. त्यांच्या रेकॉर्ड मध्ये ४ राष्ट्रीय ब्राँझ मेडलस् पण नोंदिकृत आहे. शेख रबी अहमद यांना आयोजक झायेन खान, मॅनेजिंग डायरेक्टर हिरो एमएमए क्लब नाशिक आणि मु ंबईच्या व्हायपर ३६० क्लबचे मॅनेजिंग डायरेक्टर झिशान सर यांनी अभिनंदन केले आणि रौप्य पदक प्रदान केले. त्यांच्या या यशाबद्दल मित्र आणि नातेवाईकांमध्ये आनंदाची लहर पसरली आहे. विशेष म्हणजे, नाशिकच्या हिरो एमएमए क्लबच्या रिंगणात देशातील अनेक मोठ्या खेळाडू ंनी एमएमए फायटिंग खेळण्याचा मान मिळवला आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत नागालँड, मणिपूर, मिझोराम, सिक्कीम, केरळ, दिल्ली, पंजाब, बऱ्हाणपूर (मध्य प्रदेश), उत्तर प्रदेश, मु ंबई, पुणे (महाराष्ट्र), गोवा, ओडिशा, गुजरात, बंगळूरु (कर्नाटक), आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांतील व शहरांतील एमएमए खेळाडू ंनी सहभाग घेतला होता.



आदर्श शिक्षण संस्था संचलित साक्षळ पिंप्री हायस्कूल साक्षळ पिंप्री ता जी बीड या शाळेमध्ये महात्मा श्री बसवेश्वर यांची जयंती व बालविवाह रोखण्यासाठी शासनाने घालून दिलेल्या प्रतिबंधात्मक कायद्याद्वारे शपथ घेण्यात आली यावेळी महात्मा श्री बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त सर्वांना केले उपस्थित प्रचार्य श्री पवळ पी एस सर पर्यवेक्षक श्री खोले सर व शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते यावेळी प्राचार्य पवळ सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व शिक्षकांना बालविवाह रोखण्यासाठी उपयोजना राबविणे बाबत मोलाचे मार्गदर्शन केल

# विधानसभा उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी घेतला आढावा

**बीड : जिल्हयात उसतोड कामगारांची संख्या खूप मोठी आहे. मात्र याबाबतची नोंदणी कमी आहे त्यामुळे या कामगारांच्या नोंदणीसह प्रधान्य द्यावे त्यासोबत या कामगारांच्या घरातील महिला आणि मुलींच्या आरोग्याची तपासणी होईल याचीही व्यवस्था करा असे निर्देश राज्य विधानसभा उपसभापती निलम गो-हे यांनी आज येथे दिले. जिल्हयातील दौ यात आज विविध विभागाच्या कामांचा आढावा त्यांनी आज घेतला यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने यांच्यासह विविध विभागाच्या प्रमुख अधिका-यांची उपस्थिती होती. यापूर्वी त्यांनी जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्याकडू न महिला**



**सुरक्षाविषयक बाबींचा एका बैठकित आढावा घेतला. मुली विशेषत: शालेय व महाविद्यालयीन मुलींना छेडछाड करण्याचे प्रमाण वाढले आहे यातच येथील एका मुलीने धाराशिव येथे आत्महत्या केली तिच्या कु टुंबियांशी भेट घेऊन श्रीमती गो-हे यांनी या प्रकरणी न्याय मिळवून देऊअसे तिच्या कु टुंबियास सांगितले. सदर मुलीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मदतीसाठी आवाहन केले होते. त्या कुटुंबाला सांत्वनासह मदतीचे पूर्ण आश्वासन आज श्रीमती गो-हे यांनी दिले. मुलींसाठी /महिलांसाठी मदत क्रमांक कोणत्याही प्रकारची छेडछाड अथवा इतर स्वरुपाचा त्रास दिला जात असेल तर त्यासाठी स्वतंत्र असा ुहरीरा क्रमांक जारी करण्यात आला आहे. ९२२५० ९२३८९ हा तो क्रमांक असून यावर सर्वाना मदत मागता येईल तसेच तक्रार करता येणार आहे. ही माहिती पोलीस अधिक्षकांनी यावेळी दिली हा क्रमांक सर्व ठिकाणी पोहचवा असे निर्देश श्रीमती गो-हे यांनी दिले. जिल्हयात ग्रामीण भागातील पाणी पुरवठयासाठी बीड शहराच्या पाणीपुरवठयाबाबत यावेळी आढावा घेण्यात आला तालुक्यामध्ये ९० दिवस पुरेल इतका पेयजल साठा आहे. जलजीवन योजने अंतर्गत ९४० कामे प्रगतीपथावर आहेत तथापी याची ८०० योजनांमध्ये पाणी पुरवठा सुरु देखील झाला आहे त्यामुळे सध्या ट ॅकरची मागणी नाही मात्र नियोजनाचा भाग म्हणून १० विहिरींचे अधिग्रहण प्रशासनाने केल्याची माहिती जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली. बीड शहराला पाणी पुरवठा अतिशय विलंबाने होतो त्यामुळे शहरात अधिग्रहण करुन विहिरीतून पाणी पुरवठयाचे नियोजन करा असे निर्दे श श्रीमती गो-हे यांनी दिले.याबाबत प्रस्ताव पाठवा असेही निर्देश त्यांनी नगर परिषदेचे मुध्याधिकारी निता अंधारे यांना दिले. आरोग्य विभागाने राबविलेल्या उपायांमुळे जिल्हयात ३५ वर्षाखालील स्त्रियांच्या गर्भपिशवी शस्त्रक्रियांचे प्रमाण कमी झाले आहे. याबाबत उपसभापती यांनी समाधान व्यक्त के ले. याचसोबत उसतोड महामंडळातर्फे अन्य हेळ निर्माण करुन उसतोड कामगारांच्या कुटुंबियाना आरोग्य तपासणी व इतर सुविधाबाबत प्रस्ताव करा असेही त्या म्हणाल्या. ग्रामीण रोजगार हमी योजनेत ३६५ दिवस काम दिले जाते यात केंद्रातर्फे १०० व राज्यातर्फे २६५ दिवस असे नियोजन आहे. यात जिल्हयाचे काम अतिशय चांगले आहे असे त्या म्हणाल्या. नरेगातुन ग्रामीण भागात उद्याने आणि खेळासाठी मैदानांचा समावेश करण्याच्या दृष्टीनोकोणतुन येत्या काळात नियोजन करा असेही श्रीमती गो-हे यांनी सांगितले**

# बीड जिल्ह्यात उद्योग उभारुन तरुणांच्या हाताला काम देणार-अजित दादा पवार

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी ५१ हजार सदस्यांची नोंदणी करणार- हारुणभाई इनामदार

केज/प्रतिनिधी:- बीड जिल्ह्यात उद्योग उभारून तरुणांच्या हाताला काम देणार आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी मुंबई येथील कार्यक्रमात केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जनविकास परिवर्तन आघाडीचे विलनिकरण करण्यात आले. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार यांनी आश्वासन दिले की, मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी ५१ हजार सदस्यांची नोंदणी करणार आहे.याबाबतची सविस्तर माहिती अशी की, मुंबई येथील वानखेडे स्टेडियम येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षात पक्षप्रवेशाचे आयोजन करण्यात आले होते. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख मार्गदर्शक यांच्या उपस्थितीत व जनविकास परिवर्तन आघाडीचे नगरसेवक आणि कार्यकर्त्यांची एक बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये सर्वानुमते निर्णय घेण्यात आला की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जनविकास परिवर्तन आघाडीचे विलनीकरण करून काम करण्यांचे ठरवण्यात आले.दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी वानखेडे स्टेडियम येथे एका भव्य कार्यक्रमांमध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, खासदार प्रफुल पटेल, मंत्री नवाब मलिक आमदार सना मलिक, आमदार विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्यासह पक्षांच्या प्रमुख नेत्यांच्या उपस्थित जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख, हारुणभाई इनामदार,सौ. नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, जनविकास परिवर्तन आघाडीचे मार्गदर्शक तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे, दिलीप गुळभिले, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेविकासह सौ. पद्मिनी आक्का शिंदे,माजी नगराध्यक्षा सौ.छायाताई हजारे यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्व नगरसेवक, आजी-माजी सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हॉइसचेअरमन सह शेकडो कार्यकर्त्यांनी जनविकास परिवर्तन आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्ष मध्ये विलनीकरण करुण पक्षप्रवेश केला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित दादा पवार यांनी बोलताना म्हटले की, जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी केज नगर पंचायतची एक हाती सत्ता मिळवून शहराचा चांगल्या प्रकारे विकास केला आहे. आज रोजी जन विकास परिवर्तन आघाडी ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये विलीन झाली आहे. यापुढे केज शहरात विविध विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करणार आहे. बीड जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला कामे नाहीत फक्त





बीड जिल्ह्यामध्ये नागरिकांना ऊस तोडीचे काम करण्याशिवाय पर्याय नाही त्याकरिता जिल्ह्यामध्ये मोठमोठे उद्योग उभारणार आहे या उद्योगाच्या माध्यमातून तरुणाच्या हाताला काम देणार आहे. पुढे बोलताना अजित दादा पवार म्हणाले की, यापुढे केज शहराचा विकास थांबणार नाही शहरातील विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात गती देणार आहे शहराच्या विकासासाठी कितीही निधी लागला तर निधीची कमतरता भासू देणार नाही. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जनविकास परिवर्तन आघाडी ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये विलीनीकरण करत आहोत अशी घोषणा केली. पुढे बोलताना हारुणभाई इनामदार यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी बीड जिल्हा सह केज मतदार संघामध्ये ५१ हजार सदस्य नोंदणी लवकरात लवकर करणार आहे. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख मार्गदर्शक, नगरसेवक व ग्रामीण भागातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच, चेअरमन, व्हॉइस चेअरमन यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com